१२९

# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com
फोन नं.(०२०) २६०५१११०

---

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-६/सर्व जिसनिअ/
२२५१/२०१६ आदेश पालन/६०२८/२०१६.
दिनांक :-१७/१०/२०१६

प्रति,

१) जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सर्व

२) तालुका सहकारी निवडणुक अधिकारी तथा
उप/सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, सर्व

**विषय — मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ-औरंगाबाद याचिका क्र.२२५१/२०१६ मधील आदेशाप्रमाणे निधी अभावी निवडणुका प्रलंबित असलेल्या संस्थांबाबत निबंधक या नात्याने आवश्यक वैधानिक कार्यवाही करणेबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपले लक्ष वेधण्यात येते कि,

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ नियम २(८) आणि २(२०) नुसार अनुक्रमे जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी आणि तालुका सहकारी निवडणुक अधिकारी यांची व्याख्या करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्राधिकरणाने जा.क्र.रासनिप्रा/जिल्हासनिअआदेश/५४९/२०१४ दि.१०/१०/२०१४ आणि जा.क्र.रासनिप्रा/ तालुका प्रभाग सनिअआदेश/५५०/२०१४ दि.१०/१०/२०१४ अन्वये आपले वैधानिक अधिकार क्षेत्रातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणुकासाठी जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी व तालुका सहकारी निवडणुक अधिकारी म्हणुन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम ४ च्या अनुक्रमे उपनियम (२) आणि उपनियम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या "ब" आणि "क" प्रकारच्या संस्थांच्या निवडणुका या नियमात घालुन दिलेल्या कार्यपध्दतीनुसार पुर्ण करण्याची जबाबदारी ही संबंधित जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी आणि तालुका सहकारी निवडणुक अधिकारी यांची आहे.

त्यानुसार आपले वैधानिक अधिकार क्षेत्रातील "ब" आणि "क" प्रकारच्या संस्थांच्या निवडणुका पुर्ण करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे तरीही काही तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या निवडणुका या निधी अभावी पुर्ण न झाल्याचे प्राधिकरणाच्या निदर्शनास आलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ-औरंगाबाद यांनी याचिका क्र.२२५१/२०१६ दि.२/८/२०१६ रोजीच्या आदेशामध्ये निधीअभावी निवडणुका प्रलंबित असणाऱ्या प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाबाबत अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार संबंधित संस्थेच्या निबंधकाने तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याबाबतचे आदेश निर्गमित केलेले आहेत.

आपल्या कार्यक्षेत्रातील निधी अभावी निवडणुका प्रलंबित असणाऱ्या प्राथमिक विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थाबाबत उचित वैधानिक कार्यवाही करुन याचिका क्र.२२५१/२०१६ मधील आदेशाचे अनुपालन केल्याबाबतचा अहवाल संस्थानिहाय केलेल्या कार्यवाहीसह प्राधिकरणास १५ दिवसात सादर करावा.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, म.रा. पुणे यांचे मान्यतेने**

**(डॉ. आनंद जोगदंड)**
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

सोबत - २२५१/२०१६ चा आदेश